संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

जनसंपर्क विभाग

---

**योगाभ्यासातून सामाजिक आरोग्य सुदृढ होईल – कुलगुरू**

अमरावती - (20 जून 2022)

दरवर्षी 21 जून आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून जगभर साजरा केला जातो. या पाश्र्वभूमिवर विद्यापीठाच्यावतीने आयोजित योग महोत्सवातून योगाभ्यासाचे धडे दिले जाणार असून त्यामुळे सामाजिक आरोग्य सुदृढ होईल, असे प्रतिपादन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांनी केले. आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागातील एम. ए. योगशास्त्र अभ्यासक्रम द्वारे दि. 19, 20 जून 2022 या कालावधीत आठव्या जागतिक योग दिनानिमित्त आयोजित योग महोत्सव कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी ते मार्गदर्शन करतांना बोलत होते. यावेळी स्वामी विवेकानंद योग संशोधन संस्था, बंगळूरचे कुलगुरू डॉ. एच. आर. नागेंद्र, संचालक डॉ. श्रीकांत पाटील, डॉ. प्रज्ञा पाटील आदी उपस्थित होते.

कुलगुरू पुढे म्हणाले, योगशास्त्र अभ्यासक्रमाच्या शिक्षक व विद्याथ्र्यांनी समाजोपयोगी योगवर्ग अभ्यास उपक्रम राबवून समाज सुदृढ होण्यासाठी उचलेले पाऊल स्वागतार्ह आहे. विद्यापीठातील शैक्षणिक विभागाने सामाजिक विकासासाठीचे विविध उपक्रम राबविण्याचे आवाहन याप्रसंगी त्यांनी केले. डॉ. प्रज्ञा पाटील यांनी 103 तास योग प्रात्याक्षिक करून केलेला विक्रम कौतुकास्पद असून त्यापासून विद्याथ्र्यांनी प्रेरणा घ्यावी असेही ते म्हणाले.

सुरूवातीला कार्यक्रमाचे उद्घाटन स्वामी विवेकानंद योग संशोधन संस्था, बंगळूरचे कुलगुरू डॉ. एच. आर. नागेंद्र यांनी ऑनलाईन माध्यमातून केले. विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी प्रास्ताविक मनोगतातून 1 जून ते 21 जून या कालावधीत योगवर्ग अभ्यास उपक्रम योगशास्त्र अभ्यासक्रमाच्या शिक्षक व विद्याथ्र्यांनी अमरावती शहरातील 28 नगरसेवकांच्या मदतीने शहरातील ज्येष्ठ नागरिक, बचत गट महिला, युवावर्ग यांना निरोगी आयुष्यासाठी योगाचे महत्व प्रात्याक्षिकाच्या माध्यमातून पटवून दिले. योगशास्त्राच्या विद्याथ्र्यांना करिअरच्या अनेक संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

संत गाडगे बाबा प्रतिमा पूजन व विद्यापीठ गीताने सुरू झालेल्या कार्यक्रमाला प्र-कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, वक्ते सुप्रिया चाकोले, प्रज्ञा पाटील, माजी प्राचार्य डॉ. पी. आर.राजपूत आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शुभांगी रवाळे यांनी केले. प्रा. स्वप्नील ईखार, प्रा. स्वप्नील मोरे, प्रा. राधिका खडके, प्रा भूषण परळीकर, डॉ. प्रशांत भगत, प्रा. सुरेश पवार, डॉ. रोहिणी देशमुख, प्रा. प्रीती माटे, प्रा आदित्य पुंड व प्रा.अश्विनी राऊत यांच्या आयोजनासाठी परिश्रम घेतले.

---

प्रति, जनसंपर्क विभाग

मा.संपादक/जिल्हा प्रतिनिधी, दि. 20/06/2022.

दै. ...................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**

जनसंपर्क अधिकारी

Win2PDF®

This document was created with the Win2PDF “Print to PDF” printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/